**कार्यालय भूमि संपादन विशेष अधिकारी,**
**विशेष घटक, सोलापूर.**
डॉ.कोटणीस हॉल, पहिला मजला, पार्क चौक, सोलापूर, ४१३००१.
दु.क्र.०२१७-२७२३५४८. slaosusol@gmail.com

---

जा.क्र.भूसंविअ/विघ-सो/एस.आर.-१६/२०१७ बार्शी/ ९५३ दि:१६/ ०३/२०१८.

प्रति,

प्रति,

मा. जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी
(एन आय सी) सोलापूर

विषय :- भूसंपादन-बार्शी(एस.आर.१६/२०१७)
बार्शी नगरपरिषदेच्या मंजूर विकास योजनेतील (दु.सु.) आरक्षण क्र.२१ "भाजी मंडई, दुकान केंद्र व वाचनालय " क्षेत्र -४०००.०० चौ.मी चे भूसंपादन प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४)(भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९चे समकक्ष )ची अधिसूचना प्रसिध्दी बाबत.

संदर्भ :-१.) मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मंजूर केलेली महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(४)(भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ चे समकक्ष ची अधिसूचना क्र.२०१८/भूसंपादन/कार्या-१/ एस.आर.१६/२०१७ /कावी १२५०/२०१८, दिनांक १३/०३/२०१८
२) मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचे या कार्यालयास प्रतिलिपीत केलेले पत्र क्र.२०१८/भूसंपादन/कावि/१२५०/२०१८ एस.आर.१६/२०१७ दिनांक १३/०३/२०१८

महोदय,

भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९(२) खालील प्रकट पत्र व कलम २१ (१) खालील सर्वसाधरण नोटीसीची प्रत या सोबत जोडून पाठविली आहे.

तरी सदर अधिसूचना उक्त अधिनियमातील तरतूदी नुसार सोलापूर जिल्हयाच्या संकेतस्थळावर कृपया त्वरीत अपलोड करुन प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती .

सोबत:- वरीलप्रमाणे

आपला

(मो.बा.मंडवाले)
भूमि संपादन विशेष अधिकारी,
विशेषघटक,सोलापूर.

f/barshi proposal/Adhisuchana u.s.19-2/

<u>अधिसूचना</u>

<u>जिल्हाधिकारी, यांचेकडून</u>

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६)**

**क्रमांक :- २०१८/भूसंपादन/कार्या-१/एस.आर.** /6/ 2017 कावि /1250/18

ज्याअर्थी, बार्शी नगरपालिकेची विकास योजना भागशः (दुसरी सुधारित) (यापुढे "उक्त विकास योजना/ सुधारित विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस/१७००/५८४/प्र.क्र.२८(अे)/२०००/नवि-१३, दि.०५/०२/२००२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोटकलम (१) अन्वये (यापूढे उक्त महाराष्ट्र अधिनियम म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दि.१५/०४/२००२ पासून अंमलात आली आहे**;** वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस/१७००/५८४/प्र.क्र.२८(अे)/२०००/नवि-१३, दि.२८/१०/२००४ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोटकलम (१) अन्वये मंजूर केली असून ती दि.१५/१२/२००४ पासून अंमलात आली आहे**;**

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमिन (यापुढे "उक्त जमिन" म्हणून संबोधिलेली) उक्त सुधारित विकास योजनेत **आरक्षण क्र.२१, "भाजी मंडई, दुकान केंद्र व वाचनालय"** या प्रस्तावाने बाधित होत आहे. ( यापुढे "उक्त सार्वजनिक प्रस्ताव" म्हणून संबोधिलेला)

आणि ज्याअर्थी, बार्शी नगरपालिकेने ( यापुढे उक्त नगरपालिका म्हणून संबोधिलेली ) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (१) अन्वये उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचना क्र.टीपीएस/२१७५/५१०६/युडी-७, दि.३.०३.१९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनी बाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (१) (२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिका-यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत**;**

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, सोलापूर, यांची खात्री झाली आहे **;**

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी दयावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त नगरपालिकेने अदा करावयाची आहे **;**

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (२) मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम २०१५ च्या नियम ५(दोन) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे उक्त संपादन अधिनियम म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्ही सह) ला सूट दिली आहे. सदरचा

अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण क्र.७१, दि.३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिध्द झालेला आहे आणि म्हणून उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे सरळ याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दि.२७/०८/२०१४ रोजी मंजूर केलेल्या भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ च्या, नियम १७ अनुसार या संपादन प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुस-या व तिस-या अनुसूचिनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (४) सह उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर असे घोषित करतात की, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिका-यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ खंड (ग) अन्वये याद्वारे भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु करावी असे निदेश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे सर्व्हे क्रमांक , संपादनाचे क्षेत्र , जमिनीचे नकाशे , इत्यादी कागदपत्रे **भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर, डॉ.कोटणीस हॉल, पहिला मजला, शुभराय आर्ट गॅलरीजवळ, पार्क चौक, सोलापूर-४१३००१** यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामाकाजाच्या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**अनुसूची**

**बार्शी नगरपालिका**

**गावाचे नाव- बार्शी, ता.बार्शी, जिल्हा-सोलापूर.**

| अ.क्र. | संपादन करावयाच्या जागेचे | | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|
| | गट नंबर | क्षेत्र चौ.मी. | |
| १. | ५३१ (नवीन) पैकी | ४०००.०० | **आरक्षण क्र.२१, "भाजी मंडई, दुकान केंद्र व वाचनालय"** चे भूसपांदन करणेबाबत. |
| २ | ५१० (जुना) पैकी | | |
| ३ | ५११ (जुना)पैकी | | |

दिनांक : १३ / ३ /२०१८.
ठिकाण : सोलापूर.

जिल्हाधिकारी सोलापूर (शिक्का)

जिल्हाधिकारी, सोलापूर.